**ठळक बातम्या**

- पीएम धनधान्य कृषी योजना आणि डाळ उत्पादनात आत्मनिर्भरता मोहिमेसह ४२ हजार कोटी रुपये खर्चाच्या कृषी योजनांचा प्रधानमंत्र्यांच्या हस्ते प्रारंभ / अन्नधान्य उत्पादनात आत्मनिर्भरता हेच उद्दिष्ट असल्याचा प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केला निर्धार

- शेतकऱ्यांच्या मनातही स्वदेशीला प्राधान्य ही संकल्पना रुजत असल्याचं केंद्रीय कृषीमंत्र्यांचं प्रतिपादन

- दिवाळी आणि छट पूजेनिमित्त विक्रमी संख्येनं जादा गाड्या उपलब्ध होणार

- चीनवर अतिरिक्त १०० टक्के आयात शुल्क लावण्याचा अमेरिकेचा निर्णय

**आणि**

- वेस्ट इंडिजबरोबरच्या  दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारताचा पहिला डाव ५ बाद ५१८ धावसंख्येवर घोषित

**<><><><><>**

अन्नधान्य उत्पादनात भारताला आत्मनिर्भर करणं तसंच जागतिक बाजारासाठी उत्पादन करणं हे आपलं उद्दिष्ट असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. नवी दिल्लीत पीएम धनधान्य कृषी योजना आणि डाळ उत्पादनात आत्मनिर्भरता मोहिमेसह ४२ हजार कोटी रुपये खर्चाच्या कृषी योजनांचा प्रारंभ आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. प्रधानमंत्र्यांनी यावेळी कृषी, पशुसंवर्धन, मत्स्यपालन आणि अन्नप्रक्रिया क्षेत्रातल्या ५ हजार ४५० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचंही उद्घाटन केलं. शेतकरी कल्याण, कृषी स्वावलंबन आणि ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा बळकट करणं हे या योजनांचं उद्दिष्ट आहे.

देशात आज डाळीची आयात करावी लागते, त्यामुळे डाळ उत्पादनात आत्मनिर्भरता प्राप्त करण्यासाठी ही मोहीम राबवण्यात येणार असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. देशातल्या ३५ लाख हेक्टर क्षेत्रावर डाळीचं उत्पादन करणं हे या मोहिमेचं उद्दिष्ट आहे. यात तूर, उडीद, मसुर डाळीचं उत्पादन वाढवलं जाईल, याचा फायदा दोन कोटी डाळ उत्पादकांना होईल, असं प्रधानमंत्री म्हणाले. धनधान्य योजनेत पशुधनावर लक्ष केंद्रित केल्यांचं प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट बाईट**

प्रशासनाने शेतकऱ्यांसोबत मिळून धनधान्य योजनेची अंमलबजावणी करावी असं आवाहन त्यांनी केलं.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी गेल्या अकरा वर्षात कृषी क्षेत्रात केलेल्या सुधारणांचा आढावा घेतला. या काळात अन्नधान्य उत्पादन ९०० लाख मेट्रिक टन वाढलं, फळभाज्या उत्पादन ६४० लाख मेट्रिक टनापेक्षा जास्त वाढलं, सहा मोठ्या खत उत्पादक कंपन्या उभ्या राहिल्या, मत्स्योत्पादन, मध उत्पादन दुप्पट झालं, कृषीमालाची निर्यात दुप्पट झाली असं प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितलं.

**केंद्रीय कृषीमंत्री** शिवराजसिंह चौहान यांनीही या कार्यक्रमाला संबोधित केलं. कृषी उपकरणांवर जीएसटी कमी केल्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असं कृषीमंत्री म्हणाले. रब्बी पिकांच्या हमीभावात सरकारने वाढ केली, प्रधानमंत्री किसान सम्मान निधी योजने अंतर्गत ३ लाख ९० हजार शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरित झाला, असं त्यांनी सांगितलं. केंद्र सरकारच्या स्वदेशीच्या आवाहनाला शेतकरीही प्रतिसाद देत असून स्वदेशीची भावना त्यांच्यामधे रुजत आहे, असं चौहान म्हणाले.

**होल्ड बाईट चौहान**

**<><><><><>**

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्ली रेल्वे स्थानकाला भेट देत नव्याने सुरु झालेल्या यात्री सुविधा केंद्राची पाहणी केली. या केंद्रामुळे रेल्वे स्थानक परिसरातली गर्दी कमी होऊन प्रवासही सुकर व्हायला मदत होईल असं ते म्हणाले. इथं पुरवलेल्या सुविधा आणखी ७६ रेल्वे स्थानकांवरही उपलब्ध करण्यात येतील असं वैष्णव यांनी सांगितलं. यामुळे सणासुदीच्या काळात प्रवाशांची गर्दी नियंत्रणात ठेवायला मदत होईल असं ते म्हणाले. आगामी, दिवाळी आणि छट पूजेनिमित्त विक्रमी संख्येनं विशेष रेल्वेगाड्या धावतील अशी माहिती वैष्णव यांनी दिली.

**<><><><><>**

लोकनायक जयप्रकाश नारायण आणि भारतरत्न नानाजी देशमुख यांच्या जयंतीनिमित्त मान्यवरांनी त्यांना आदरांजली अर्पण केली आहे.

लोकशाही मूल्य, नागरी स्वातंत्र्य आणि लोकांचं सबलीकरण यासाठी वचनबद्ध राहिलेले जयप्रकाश नारायण हे द्रष्टे नेते होते अशा शब्दात उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी आदरांजली वाहिली आहे. तर नानाजी देशमुख यांच्या निःस्वार्थी सेवेच्या तत्वांनी सर्वांना प्रामाणिक आणि समर्पित भावनेने देशसेवा करण्यासाठी प्रेरणा मिळाल्याचं राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही लोकनायक जयप्रकाश नारायण आणि भारतरत्न नानाजी देशमुख यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचं स्मरण करत त्यांना आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

नक्षलींच्या तीन मोठ्या नेत्यानी काल तेलंगणा पोलिसांसमोर शरणागती पत्करली. के. वेंकटय्या उर्फ विकास, एम वेंकटराजू उर्फ चंदू, आणि तोडम गंगा उर्फ सोनी अशी त्यांची नावं आहेत. या तिघांवर प्रत्येकी वीस लाख रुपयांचं इनाम होतं.

**<><><><><>**

अमेरिकेने येत्या एक नोव्हेंबरपासून चीनवर अतिरिक्त १००टक्के आयात शुल्क लादण्याचा निर्णय घेतला आहे. चीनने मौल्यवान दुर्मिळ खनिजांवर नव्याने निर्यात निर्बंध लावल्यानंतर, त्याला प्रत्युतर म्हणून अमेरिकेने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे चीनकडून आयात होणाऱ्या मालावर १३० टक्के कर लागू होईल. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी चीनने निर्यात नियंत्रण रद्द केल्यास हा कर मागे घेतला जाऊ शकतो असंही त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

इसराएल आणि हमास दरम्यान शस्त्रसंधीच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप उद्या पासून इस्त्राएल आणि इजिप्तच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात ते इस्त्राएलच्या संसदेत भाषण करणार असून नंतर शस्त्र संधीतल्या कलमांनुसार मुक्त झालेल्या ओलिसांशी ते संवाद साधणार आहेत. या श्स्त्रसंधीमुळे पश्चिम आशियात शांतता नांदेल असा विश्वास ट्रंप यांनी व्यक्त केला आहे. २०२३ पासून चाललेल्या  संघर्षाला या युद्धबंदी करारामुळे पूर्णविराम मिळाला आहे.

**<><><><><>**

अमेरीकेच्या मध्यस्थीतून इस्त्राएल आणि हमास दरम्यान  युद्धबंदी  करारावर स्वाक्षऱ्या झाल्यानंतर हजारो पॅलेस्टिनी नागरिक उत्तर गाझा पट्ट्यांवर परतले आहेत. या करारामुळे इस्त्राएल हमास युद्ध संपण्याची चिन्ह दिसत आहेत. गाझा पट्ट्यांमधून इस्त्राएलच्या फौजाही माघारी परतत असल्याची माहिती अमेरिकेचे राजदूत स्टीव्ह विटकॉफ यांनी दिली आहे. गाझामध्ये अजूनही ४८ युद्धकैदी असून यापैकी २० जण जिवंत असल्याचं इस्त्राएलच्या अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे. हमास येत्या सोमवारपर्यंत या सर्वांची मुक्तता करण्याची शक्यता या अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. या करारानुसार गाझा पट्ट्यात मानवतावादी सहाय्य पुरवण्याचा मार्गही खुला झाला आहे.

**<><><><><>**

भारत आणि वेस्ट इंडिज दरम्यान नवी दिल्लीत सुरु असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या दुसऱ्या दिवशी भारतानं आपला पहिला डाव ५ बाद ५१८ धावसंख्येवर घोषित केला आहे. कर्णधार शुभमन गिल १२९ धावांवर नाबाद राहीला. कालच्या २ बाद ३१८ धावसंख्येवरुन आपला पहिला डाव सुरु करणाऱ्या भारतानं आपला तिसरा गडी झटपट गमावला. काल दिवसअखेर १७३ धावांवर नाबाद असलेला यशस्वी जयस्वाल अवघ्या २ धावा काढून धावबाद झाला. त्यानंतर मात्र कर्णधार शुभमन गिल आणि नितीशकुमार रेड्डीनं चौथ्या गड्यासाठी ९३ धावांची भागीदारी केली. उपाहारापर्यंत भारतानं ४ बाद ४२७ धावांपर्यंत मजल मारली होती.

<><><><><>

दक्षिण कर्नाटक, तामिळनाडू, पुदुचरी आणि कराईकल इथं आज मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. तर केरळ, आंध्र प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुराच्या काही भागात उद्यापर्यंत मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. दरम्यान महाराष्ट्रात मान्सूनचा परतीचा प्रवास कालपासून सुरू झाला. राज्यात मान्सूनच्या परतीची सीमारेषा अलिबाग, अहिल्यानगर, आणि अकोला इथून जात आहे. पुढच्या तीन ते चार दिवसात राज्याच्या इतर भागातूनही मान्सूनच्या परतीसाठी परिस्थिती अनुकूल असल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे.

//<><><><><>//